**L. A. BILL No. XXV OF 2025.**

*A BILL*

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PUBLIC TRUSTS ACT.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५.**

**महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २० मार्च, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक २१ मार्च, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९५० चा २९. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव. **१.** या अधिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे.

सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ४१अअ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ४१अअ मध्ये, पोट-कलम (४) मधील, खंड (अ) मध्ये, उप-खंड (चार) नंतर, पुढील उप-खंड दाखल करण्यात येतील :– १९५०चा २९.

"(पाच) राज्य शासनाने, कलम ५८ अन्वये सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन निधीमध्ये वार्षिक अंशदानाचे प्रदान करण्यातून सूट दिलेली आहे ;

(सहा) राज्य शासनाकडून, केंद्र सरकारकडून किंवा त्यांच्या उपक्रमांकडून किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाकडून, वीज आकार, पाणीपट्टी, नगरपालिका किंवा स्थानिक संस्था कर यांचे प्रदान करण्यातून सवलत किंवा सूट किंवा शिथिलता देण्यात आली आहे, अथवा इतर कोणतीही आर्थिक सवलत किंवा सूट किंवा शिथिलता देण्यात आली आहे ;".

सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ५८ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५८ मध्ये, पोट-कलम (२) मधील, "दुर्भिक्ष, अवर्षण, पूर, आग किंवा इतर नैसर्गिक आपत्ती यांमुळे ओढवलेल्या आपत्तीच्या निवारणासाठीच केवळ असतील त्या विश्वस्तव्यवस्थांना" या मजकुरानंतर, पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

"किंवा ज्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, रुग्णालय (कोणतेही शुश्रूषालय किंवा प्रसूतिगृह यांसह), दवाखाना किंवा कलम ४१अअ मध्ये "वैद्यकीय केंद्र" म्हणून निर्दिष्ट केलेले वैद्यकीय सहाय्यासाठी असणारे इतर कोणतेही केंद्र चालवीत असतील, आणि ज्यांचा वार्षिक खर्च, पाच लाख रुपयांपेक्षा किंवा राज्य शासनाकडून, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी, विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा इतर मर्यादेपेक्षा अधिक आहे त्या विश्वस्तव्यवस्थांना,".

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५.]**

**[महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.]**

**[श्री. देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.**]**

**[विधानसभेने दिनांक २० मार्च, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[विधानपरिषदेने दिनांक २१ मार्च, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई